
# राजर्षि शाहू महाराज :

## सामाजिक सुधारणा व सद्यःस्थिती

(समाजशास्त्र)



: संपादक :

प्रा.आर.डी.राठोड

: मुख्य संपादक :

प्राचार्य, डॉ.आर.के.इप्पर

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नित
जवाहर शिक्षण संस्थेचे, वैद्यनाथ कॉलेज, परळी वैजनाथ
ता.परळी वै. जि.बीड (महाराष्ट्र)

# समाजशास्त्र विभाग आयोजित
## राष्ट्रीय चर्चासत्रातील निवडक शोधनिबंध

राजर्षि शाहू महाराज : सामाजिक सुधारणा व सद्य:स्थिती (समाजशास्त्र)

संपादक - प्रा. आर. डी. राठोड
मुख्य संपादक - प्राचार्य डॉ. आर. के. इप्पर

---

ISBN - 978-93-5240-092-8

---

अरुणा प्रकाशन
१०३, ओमकार कॉम्प्लेक्स-अ,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर
मो. ९४२१४८६९३५, ९४२१३७१७५७

---

मूल्य : २८०/- रूपये

---

© सर्व हक्क संपादकाधिन .

---

: प्रथम आवृत्ती : ७ मार्च २०१७

---

मुद्रक : आर्टी ऑफसेट लातूर
अक्षरजुळवणी : हिंदवी कॉम्प्यूटर
मुखपृष्ठ संकल्पना : विरू गुळवे

---

* 'राजर्षि शाहू महाराज : सामाजिक सुधारणा व सद्य:स्थिती (समाजशास्त्र)' या पुस्तकातील सर्व लेखन...
... सहमत असतीलच असे ...

ISBN 978-93-5240-092-8

# छत्रपती शाहु महाराजांचे स्त्री शिक्षण विषयक धोरण

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

डॉ. काळे बाळासाहेब मुंजाभाऊ
मराठी विभाग
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय.सोनपेठ

**प्रस्तावना :**

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात समाजात गरीब- श्रीमंत, श्रेष्ठ - कनिष्ठ, स्पृश्य - अस्पृश्य, स्त्रि - पुरुष, पंथ भेद आशा स्थितीत संपुर्ण सजाज अडकुन बसला होता. स्त्रीयांवर अनेक सामाजिक,धार्मिक बंधने निर्माण झाली होती. स्त्रीयांच्या बाल विवाह, सती प्रथा, देवदासी, केशवपन, काडीमोड, मुरोळी, इत्यादी वाईट प्रथा निर्माण झाल्या आशा स्थितीत स्त्रिया शिक्षणापासून कोस दुर होत्या. अशा स्थितीत छत्रपती शाहू महाराजांनी मुलांबरोबरच मुलीनांही यथायोग्य शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न केले. ज्योतीराव फुलेंचा स्त्री शिक्षणाचा वारसा शाहू महाराजांनी पुढे चालवला.आपल्या संस्थानात स्त्रियांना मोफत उच्च शिक्षण दिले. आपल्या विधवा सुनबाई इंदुमती राणीसाहेब यांनाही शिक्षण देण्यास त्यांनी सुरुवात केली. त्यांना लिहिलेल्या पत्रात शाहू महाराज म्हणतात, " तुम्ही जस जशा अधिकाधिक शिकाल तसे तुमचे मानसिक क्षितिज विस्तारेल आणि तुमचे विचार अधिकाधिक उदात्त होतील शिक्षणाकडे सबब दुर्लक्ष करु नका "

**स्त्री शिक्षणास प्रोत्साहन :** छत्रपती शाहू महाराजानी कोल्हापुर संस्थानात मुला बरोबर मुलींच्या शिक्षणाला तेवढेच महत्व दिले.छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापुर संस्थानात स्त्रियांना शिक्षण देण्याचे महान कार्य केले. स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे महाराज किती पुरोगामी विचाराचे होते हे आपल्याला दिसून येते. संस्थानात मुला मुलींच्या शाळा होत्या त्या शिवाय खास मुलींच्यासाठी स्वंतत्र अशा शाळा स्थापन केल्या गेल्या होत्या. विशेषत: महाराजांच्या कारकीर्दीत सह्याद्रयीलगतच्या मागसलेल्या भागात मुंलीच्या शाळा स्थापन झाल्या होत्या.

**मुलींसाठी शैक्षणिक सवलती :**कोल्हापुर वस्तीगृहाचे शहर झाले होते. कोल्हापुरात जवळपास विस जातीसाठी विस वस्तीगृह निर्माण झाले होते या ठिकाणी मुलाबरोबरच मुलींनी अधिक शिकावे यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी वेगवेगळे प्रयत्न केले. मुलांच्या शिक्षणासोबतच मुलींच्या शिक्षणाची सोय महाराजांनी केली. १९९१ सालच्या ६ ऑक्टोबरचा पुढील आदेश पहा " तमाम लोकास जाहीर करण्यात येते की, त्यांच्यात पडदा पाळण्याची रीत नाही आणि ज्यांच्यातील मुलीना व स्त्रीयांना शिक्षण घेण्याची इच्छा आहे त्या त्या विद्यार्थ्यानींची राहण्याची, जेवणाची व शालेय फी पुस्तकाची वगैरे सारी सोय सरकारी खर्चाने करण्यात येईल."

**मुलीच्या स्वतंत्र शाळा :** छत्रपती शाहू महाराजांनी मुलीच्या शिक्षणाला अर्थिक प्रोत्साहन दिले " यासाठी महाराजांनी त्यांच्यासाठी अनेक ठिकाणी स्वतंत्र शाळा काढल्या शिक्षणासाठी त्यांना प्रवास करुन शहरात यावे लागू नये यासाठी ग्रामीण भागातही मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढल्या" छत्रपती शाहू महाराजांच्या मते शिक्षण घेतले तर समाज शहाणा होईल

[illegible]240-092-8

शहाणा समाज बनवायचा असेल तर आपल्याला पुरुषा बरोबर स्त्रियांच्या शिक्षणाकडे जास्त लक्ष द्यावे लागेल म्हणुन स्त्रीयांना विसरुन चालणार नाही.

जिथे मुलीसाठी स्वतंत्र शाळा नव्हत्या तेथे मुले आणि मुली एकत्र शिकत होत्या. मुलीना शिक्षणाच्या बाबतीत प्रोत्साहन देण्यासाठी आज शासनाने सवित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, मुलींची फी माफ, पुस्तके मोफत योजना सुरु केल्या आहेत पण छत्रपती शाहू महाराजांनी शंभर वर्षापुर्वी ह्या सर्व गोष्टी केल्या.

**शिक्षकांना इनाम म्हणुन बक्षीस योजना :** ज्या ठिकाणी मुलीच्या स्वतंत्र शाळा नव्हत्या त्या ठिकाणी मात्र मुल मुली एकत्र शिक्षण घेत होती. छत्रपती शाहू महाराजांच्या मते मुला प्रमाणे मुलींनी पण शाळेत जावे आणि मुलांच्या बरोबरीने शिक्षण घ्यावे. यासाठी महाराजांनी मुलींच्या शाळेत येणारी संख्या कशी वाढवता येईल यासाठी खास उत्तेजन दिले. " विशेषत: मुलींच्या शिक्षणात शिक्षकांनी अधिक रस घ्यावा, म्हणुन बक्षिस दिले जात" प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीतही शाहू महाराजांनी विशेष लक्ष घातल्याचे दिसून येते शिक्षकांनी अधिक चांगले शिकवावे यासाठी मासिक वेतन, प्रशिक्षण दिले जात असे.

**हुशार मुलींसाठी शिष्यवृत्ती :** छत्रपती शाहू महाराजांच्या काळा पर्यंत स्त्रियांची अतिशय वाईट स्थिती होती. स्त्रीयांना कोणतेही अधिकार व हक्क नव्हते. त्यांना कोणत्याही सर्वाजनिक समारंभात भाग घेता येत नसे. स्त्रियांवर अनेक बंधने होती. बालविवाह, शिक्षण बंदी हुंडाबळी, सतीची पध्दत, बालिकाबळी, पडदापध्दत तसेच त्यांच्यावर होणारे आत्याचार व स्त्रियांचे जीवन हे पुर्णपणे अंधकारमय बनले आहे. अशा परिस्थितीतुन स्त्रियांना बाहेर काढायचे तर त्यांना शिक्षणच द्यावे लागेल हे पुर्णपणे छत्रपती महाराजांनी ओळखले होते.

त्यासाठी महाराजांनी " संस्थानातील हुशार मुलींना शिक्षणात प्रोत्साहन मिळावे यासाठी राजकन्या राधाबाई उर्फ आक्कासाहेब व श्री नंदकुवर भावनगरच्या महाराणी यांच्या नावाने शिष्यवृत्ती जाहीर केल्या.शिष्यवृत्तीसाठी शाळा खात्याने काही नियम बनवले त्या नुसार प्रत्येक स्कॅलरशिप दरवर्षी ४० रुपयाची राहील ती वर्षा पर्यंत चालु राहील यासाठी लायक मुलीची स्कॉलरशिपसाठी निवड करण्यात येईल असे ५ एप्रिल १९९३ च्या आदेशानुसार जाहीर करण्यात आले."

**स्त्री शिक्षणा विषयी तळमळ :** छत्रपती शाहू महाराजांची स्त्री शिक्षणाविषयची ही तळमळ त्यांच्या विधवा सुनेला इंदुमतीदेवीना शिक्षण देण्याचा प्रसंग उदभवला तेंव्हा दिसून येते. कारण इंदुमितीदेवीनी शिक्षण देणे हे राजपरिवारातील लोकांना आवडेना म्हणुन त्यांनी कडवा विरोधी केला. परंतु छत्रपती शाहू महाराजांनी राजपरिवारातील विरोध धुडकावुन लावला आणि इंदुमतीदेवीना शिक्षण देण्याचा धाडसी निर्णय घेतला व सोनतळी कॅम्पवर तो अमलातही आणला. इंदुमतीदेवीचे आयुष्य म्हणजे शाहू छत्रपतीच्या स्त्रीशिक्षण विषयक कल्पना राबविण्यात ग्रामप्रयोगशाळा होती.

**मुलीचे उच्च शिक्षण :** "मुलींच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीतही शाहू महाराजांनी अत्यंत उदार दृष्टी ठेवली होती. राजाराम कॉलेज मध्ये शिकणाज्या सर्व मुलीना त्यांनी शिक्षण

ISBN 978-93-5240-092-8

मोफत केले होते. रखमाबाई केळकरांच्या कन्या कृष्णाबाई यांना महाराजांनी वैदयकीय शिक्षणासाठी मुंबईच्या सेंट मेडीकल कॉलेजमध्ये पाठवुन त्यांना डॉक्टर बनविले. आणि कोल्हापूरच्या एडवर्ड मेरोरियल हॉस्पिटल मध्ये वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी म्हणुन नियुक्त केले. लवकरच महाराजांच्या प्रोत्साहनाने व अर्थसाह्याने कृष्णाबाई उच्च वैद्यकीय शिक्षणासाठी इंग्लडला गेल्या. आणि उच्च विद्याविभुषित होऊन त्या कोल्हापुर संस्थानाच्य सेवेत पुन्हा रुजु झाल्या. १८९५ सालच्या पुण्याच्या कॉग्रेसच्या अधिवेशनात महाराजांच्या सुचनेवरुन कृष्णाबाई व त्यांच्या भगिनी व्दारकाबाई ह्या दोघी स्वंयसेविका म्हणुन हजर होत्या,ही खास नमुद करण्यासाठी गोष्ट आहे." असे असले तरी मुलींच्या शिक्षणा बाबत काही अभ्यासकांची समजूत असावी या दृष्टीने डॉ. रमेश जाधव यांचे पुढील विवेचन लक्षात घेता येईल.

**छत्रपती शाहू महाराजांचे अस्पृश्य स्त्री शिक्षण विषयक धोरण :** हिंदु समाजात छत्रपती शाहू महाराजांच्या काळात अस्पृश्य जातीच्या वाटयाला फार वाईट व अत्यंत वाईट प्रतीचे जीवन वाट्याला आले होते. अस्पृश्यांना शिक्षणाचा अजिबात अधिकार नव्हता.त्याच बरोबर त्यांच्यावर अनेक सामाजिक बंधने होती उदा: देवळात चावड्या, सार्वनिक पाणवठे ह्या ठिकाणी त्यांना अजिबात प्रवेश नव्हता. अस्पृश्य समाजातील एखाद्या व्यक्तीने चांगले राहण्याचा प्रयत्न केला तर सवर्णा लोंकाकडुन कट्टर विरोध होत असे. छत्रपती शाहू महाराज म्हणतात, छत्रपती शाहू महाजांच्या काळात अनेक वाईट रुढी परपंरा निर्माण झाल्या होत्या.

छत्रपती शाहू महाजांच्या काळात अनेक वाईट रुढी परपंरा निर्माण झाल्या होत्या. स्त्रियांना धर्माने शिक्षण नाकारले होते.अशा स्थितीत स्त्रीयां शिक्षणापासुन वंचीत होत्या. छत्रपती शाहू महाराजांनी स्त्रींयांना गुलाम गिरीतून बाहेर काढण्यासाठी स्त्रींयांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा धाडसी निर्णय घेतला. स्त्रीं शिक्षणास प्रोत्साहान देऊन मुलीसाठी अनेक सोई सवलती निमार्ण करुन दिल्या. मुलींच्या स्वातंत्र्य शाळा काढुन तसेच हुशार मुलींसाठी शिष्यवृती जाहीर करुन मुलींच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीत सोय सुविधा निर्माण करुन दिल्या. आज जे महाराष्ट्र शासन मुलीच्या बाबती धोरण राबवित आहे ते धोरण शाहू महारांजानी शंभर वर्षा पुर्वी मुलींच्या शिक्षणाच्या बाबती धोरण आवलंबून यातुन त्यांचे पुरोगामीत्व दिसुन येते.

**संदर्भसुची :**


१) उत्तम कांबळे, 'राजर्षी शाहू आणि महिला मुक्ती ' पान नं. १४

२) प्रा.रघुनाथ कडवे, 'लोकांचा राजा छत्रपती शाहू महाराज '

३) डॉ. जयसिंगराम पवार, 'शाहू स्मारक ग्रंथ' 'राजर्षी शाहू महाराज आणि शिक्षण'

४) डॉ. रमेश जाधव, 'लोकराजा शाहू छत्रपती '


***